सोबत मराठी भाषा विभाग यांचे "शासन व्यवहारात मराठीचा वापर मंत्रालयीन विभागांची संकेतस्थळे मराठीतून करण्याबाबत" या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक मभावा-२०१७/प्र.क्र.६/भाषा २, दिनांक २७.१.२०१७ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१७/शा५३६
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 8 MAR 2017

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

( अैनुल अत्तार )
विशेष कार्य अधिकारी,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सह... वि. 2543 आवक

जा.क्र.विकाऔ/आस्था/२०१७/ 2920
दिनांक 8 JUN 2017

प्रति,
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, मराठी भाषा विभाग यांचे **"शासन व्यवहारत मराठीचा वापर मंत्रालयीन विभागांची संकेतस्थळे मराठीतून करण्याबाबत"** या विषयाचे परिपत्रक क्रमांक मभावा-२०१७/प्र.क्र.६/भाषा-२, दि.२७.०१.२०१७ ची प्रत सोबत जोडली आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या परिपत्रकातील तरतुदी आपल्या संस्था/कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

... " शासन व्यवहारात मराठीचा वापर-मंत्रालयीन विभागांची संकेतस्थळे मराठीतून करण्याबाबत..." या विषयाबाबतचे मराठी भाषा विभाग, क्र.मभावा-२०१७/प्र.क्र.६/भाषा-२, दि.२७ जानेवारी, २०१७ रोजीचे शासन परिपत्रक.

---

पृष्ठांकन क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २४/२०१७/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दूरध्वनी क्र.२२८५५७६६,
दिनांक : १७.०२.२०१७

प्रति,

मा.प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण ), यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/तंत्रशिक्षण/कला/ ग्रंथालये ),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
संचालक ( उच्चशिक्षण/तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.
( त्यांना विनंती करण्यात येते की,सोबतच्या शासन परिपत्रकातील तरतुदी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या /अधिका-यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी)

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

कार्यासन आस्था-२ संग्रहार्थ.

उच्चशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. ५३६
दिनांक २२/०२/२०१७

पत्र प्राप्त झाले
२० FEB

C:\Users\shirish.padolya\Documents\क्र.CR_२४_२०१७.docx

९।५

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन ५/८/२
दिनांक ०४.०२.१७

3 FEB 2017

६७९
०६.०२.१७

शासन व्यवहारात मराठीचा वापर
मंत्रालयीन विभागांची संकेतस्थळे मराठीतून
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- मभावा-२०१७/प्र.क्र.६/भाषा-२
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जानेवारी, २०१७

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मभावा- १०८०/प्र.क्र५४/२०, दि. १८.०५.१९८२
२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. मभावा-१०८६/४३२/प्र.क्र.१६१/८६/वीस-ब,दि.१८ जुलै, १९८६
३) सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१०/प्र.क्र.७५/२०-ब, दिनांक १४.०७.२०१०
४) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.मभावा-१०११/प्र.क्र.७८/२०११/भाषा-२,दि.१० मे, २०१२.
५) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.मभावा-१०१३/प्र.क्र.९/२०१३/भाषा-२,दि. २९.०१. २०१३.

शासन परिपत्रक-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार सामान्य प्रशासन विभाग, दि. ३०.०४.१९६६ च्या अधिसूचनेन्वये "मराठी" ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे. सदर अधिनियमानुसार मराठीचा राजभाषा म्हणून स्वीकार करण्यात आला आहे. राजभाषेच्या प्रशासनिक वापराबाबत तत्कालीन सामान्य प्रशासन विभाग तसेच मराठी भाषा विभागामार्फत वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

शासकीय कार्यालयातील कामकाजात मराठीचा वापर करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, पत्रव्यवहार, संकेतस्थळे इत्यादीमध्ये मराठीचा वापर करण्याच्या सूचना संदर्भाधिन दि. २९ जानेवारी, २०१३ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, विभागांची संकेतस्थळे मराठीतून करण्याच्या सूचना देऊनही अनेक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची संकेतस्थळे आणि त्यामधील मजकूर इंग्रजी मधून प्रसिध्द करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. विभागांची संकेतस्थळे मराठीत नसल्याबाबतच्या तक्रारी/निवेदने, मान्यवर, लोकप्रतिनिधी, जनता यांचेकडून वारंवार "आपले सरकार" या वेबपोर्टलच्या माध्यमातून तसेच लेखीही विभागास प्राप्त होत आहेत. काही मंत्रालयीन विभाग व त्यातंर्गत क्षेत्रीय कार्यालयांची संकेतस्थळे संपूर्णत: इंग्रजीमध्ये आहेत. उदाहरणादाखल सदर विभागांची नावे सोबतच्या प्रपत्रात जोडली आहेत.

इंग्रजी संकेतस्थळे असलेल्या सदर विभागांनी त्यांची संकेतस्थळे मराठीतून करावीत. ज्या विभागाची माहिती इंग्रजीमधून देणे आवश्यक आहे अशा विभागाचे संकेतस्थळ उघडल्याबरोबर मूलभूतरित्या (by default) मराठी भाषेतून माहिती नागरिकांपर्यंत पोहचविणे गरजेचे असल्याने मराठी व इंग्रजी दोन्ही पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सूचना सर्व मंत्रालयीन विभाग/ कार्यालय प्रमुख व विभागप्रमुख यांना देण्यात येत आहेत. सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८।२।१७

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०१२७१४३९५१२५३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Leena Vivek Dhuru

Digitally signed by Leena Vivek Dhuru
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Leena Vivek Dhuru
Date: 2017.01.27 14:38:12 +05'30'

(लिना वि. धुरू)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्यसचिव/ अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५) मा.मंत्री, मराठी भाषा यांचे विशेष कार्य अधिकारी
६) सर्व जिल्हाधिकारी
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सर्व मंत्रालयीन विभाग
९) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१२) प्रबंधक उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने)
१३) प्रबंधक उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
१४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२०) भाषा संचालक,भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व),मुंबई
२१) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, रविंद्र नाट्य मंदिर, मुंबई
२२) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,रविंद्र नाट्य मंदिर, मुंबई
२३) संचालक, राज्य मराठी विकास संस्था,धोबीतलाव, मुंबई
२४) निवड नस्ती (भाषा-२)

सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

## शासन परिपत्रक क्र.मभवा-२०१७/प्र.क्र.६/भाषा-२, दि. २७ जानेवारी, २०१७ सोबतचे परिपत्रक
## फक्त इंग्रजीतून माहिती प्रसिध्द केलेली संकेतस्थळे
### प्रपत्र -१

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | प्रशासकीय विभाग |
|---|---|---|
| १) | माहिती व तंत्रज्ञान | सामान्य प्रशासन विभाग |
| २) | मुख्य निवडणूक अधिकारी | |
| ३) | राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोग | |
| ४) | महाराष्ट्र राज्य विमानतळ विकास प्राधिकरण | |
| ५) | महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ | |
| ६) | महाराष्ट्र राज्य पोलीस | गृह विभाग |
| ७) | महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभाग | |
| ८) | मुंबई पोलीस | |
| ९) | मोटार वाहन विभाग | |
| १०) | वन विकास महामंडळ | महसूल व वन विभाग |
| ११) | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ | कृषी विभाग |
| १२) | राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक | |
| १३) | महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ | |
| १४) | महाराष्ट्र राज्य अग्नीशमन सेवा | नगर विकास विभाग |
| १५) | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| १६) | मुल्य वर्धित कर (विक्रीकर विभाग) | वित्त विभाग |
| १७) | शासकीय जमा लेखा प्रणाली | |
| १८) | सार्वजनिक उपक्रमांची माहिती | |
| १९) | महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ | उद्योग विभाग |
| २०) | महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ | |
| २१) | अन्न व औषध प्रशासन | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग |
| २२) | आयुष संचालनालय | |
| २३) | वैद्यकीय शिक्षण संचालनालय | |
| २४) | हाफकीन बायोफार्मास्युस्टीकल महामंडळ मर्यादित | |
| २५) | हाफकीन प्रशिक्षण,संशोधन व चाचणी संस्था | |
| २६) | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | |
| २७) | कामगार विभाग | उ.ऊ. व कामगार विभाग |
| २८) | अनिवासी भारतीय आरोग्य नोंदणी | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| २९) | आयुर्वेद संस्था | |
| ३०) | इंद्रायणी हातमाग | सहकार व वस्त्रोद्योग |
| ३१) | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित | |
| ३२) | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित | |

| | | |
|---|---|---|
| ३३) | शिक्षण संचालनालय | उच्च व तंत्रशिक्षण विभाग |
| ३४) | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय | |
| ३५) | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ | ऊर्जा विभाग |
| ३६) | महाराष्ट्र राज्य उर्जा विकास अभिकरण | |
| ३७) | महाराष्ट्र राज्य विद्युत निमायक आयोग | |
| ३८) | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | |
| ३९) | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित | |
| ४०) | महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग |
| ४१) | दर्शनिका विभाग | |
| ४२) | महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ | |
| ४३) | मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ | अल्पसंख्यांक विकास विभाग |
| ४४) | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग |
| ४५) | महिला आर्थिक विकास महामंडळ | महिला व बालविकास विभाग |